संशोधन आराखडा

परभणी जिल्हयातील कृषी माल प्रक्रिया उद्योग:
विशेष अभ्यास 'डाळ प्रक्रिया उद्योग'

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड,
सामाजिक शास्त्र / मानव्यविद्याशाखेच्या अंतर्गत अर्थशास्त्र विषयात
पीएच.डी पदवीच्या नोंदणीसाठी संशोधन आराखडा.

संशोधक विद्यार्थी
उगले सुरेश श्रीहरी

मार्गदर्शक
डॉ.टी.व्ही.मुंडे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
के.के.एम.महाविद्यालय, मानवत.

संशोधन केंद्र
सामाजिक शास्त्र संकुल,
स्वा.रा.ती.म.वि.नांदेड

ऑगस्ट - 2017

<u>अनुक्रमणिका</u>

- प्रस्तावना
- भारतातील कडधान्य लागवड व उत्पादनाचा 2013-14 मधील त्रोटक आढावा.

  तूर, मूग,उडीद आणि हरभरा
- महाराष्ट्रातील डाळ प्रक्रिया उद्योग.
- मराठवाडा विभागातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग
- परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग
- विषयाचे महत्व
- उद्देश
- विषयाची गृहितके
- संशोधन पध्दती

  दुय्यम सामग्री

  प्राथमिक सामग्री
- नमुना निवड पध्दती
- प्रकरण योजना
- संदर्भ सुची

परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग : विशेष अभ्यास

डाळ प्रक्रिया उद्योग

प्रस्तावना :-

21 व्या शतकात जगाने झेप घेतली ती यंत्रा-तंत्राच्या साहयाने, या गतिमान आधुनिक युगात वेगवेगळया क्षेत्रात आमुलाग्र क्रांती घडुन आली. जगातल्या प्रगत राष्ट्रांनी उद्योग, सेवा क्षेत्राबरोबरच कृषी क्षेत्रात देखील क्रांती कारक बदल घडुन आणले. कृषीला व्यावसायिक दर्जा प्राप्त करुन दिला, विशेषीकरणाचे लाभ मिळवून दिले, बाजारपेठेचा विस्तार केला. या तुलनेत भारतासारख्या कृषी प्रधान राष्ट्राला मात्र कृषीक्षेत्राला फारसा न्याय मात्र मिळवून देता आला नाही. कृषीप्रधान म्हणवून घेणाऱ्या राष्ट्रात असे का घडले असावे? असा यक्ष प्रश्न भारतातल्या अनेक तज्ज्ञ व्यक्तीच्या अभ्यासाचा विषय ठरला. जगाच्या तुलनेत भारतीय कृषीला अनुकूल वातावरण लाभले, कार्यकारी लोकसंख्या लाभली, भौगोलिक दृष्टया संपन्न असा भुभाग लाभला, असे असतांना देखील भारताचा, भारतातील राज्यांचा म्हणावा तसा फारसा विकास झाला नाही. काय याला शेतकरी जबाबदार आहे ? शेतीचे लहान अकारमान जबाबदार आहे ? निसर्ग जबाबदार आहे ? की , सरकार जबाबदार आहे ?

देशाची ही जी स्थिती आहे नेमकी हिच स्थिती देशातील काही घटक राज्याची, घटकराज्यातील विभागाची, प्रांताची आहे. कृषी उत्पादनात महाराष्ट्र राज्याची स्थिती सन्मानजनक आहे. परंतू संपूर्ण महाराष्ट्राची स्थिती मात्र नक्कीच सन्मानजनक नाही. भारतात अशी काही राज्य आहेत की,ज्यांचा विकास इतर राज्यांच्या तुलनेत अधिक झाला आहे. ज्यामध्ये महाराष्ट्र , कर्नाटक , आंध्रप्रदेश , मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पश्चिमबंगाल,तामिळनाडू व गुजरात या घटक राज्यांचा समावेश होतो. या राज्यांच्या प्रगतीचे कारण म्हणजे ज्या पध्दतीने कृषीउत्पादनात वाढ होत होती, त्याच पध्दतीने या राज्यांनी कृषी प्रक्रिया उद्योगाचा विकास देखील केला. परंतू या राज्यांच्या प्रत्येक प्रांताचा सारखाच विकास झाला असे मात्र नाही. महाराष्ट्रात पश्चिम महाराष्ट्राचा ज्या दिशेने विकास झाला त्याच दिशेने

मराठवाडयाचा विकास मात्र झाला नाही. मराठवाडा विभागात औरंगाबाद जिल्हयाचा जो विकास झाला, तो परभणी जिल्हयाचा नक्कीच झाला नाही. असे का घडले ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे परभणी जिल्हयात प्रक्रिया उद्योगांचा अभाव असावा , प्रक्रिया उद्योगाविषयी अज्ञान असावे , कृषी व्यवसायाकडे पाहण्याचा पारंपारिक दृष्टीकोण असावा, विशेषीकरणाचा अभाव असावा अशा अनेक समस्या विकास रोखण्यास कारणीभूत असु शकतात.

अर्थातच कृषी विकास हा केवळ कृषी उत्पादनात होणारी वाढ एवढाच मर्यादित नाही तर, कृषी आधारीत उद्योगात होणारी वाढ, कृषी पूरक उद्योगात होणारी वाढ, बाजारपेठांचा विस्तार, विशेषीकरनाच्या संधी, रोजगार संधीत होणारी वाढ यासारख्या अनेक गोष्टींचा समावेश विकासात समावेशित असतो व हे शक्य होते कृषीमाल प्रक्रिया उद्योगामुळे त्यामुळे अगोदर कृषीमाल प्रक्रिया उद्योगाचे भारतातील स्वरुप व व्याप्ती या विषयी अभ्यास करुन, खरचं कृषीमाल प्रक्रिया उद्योग शेतीसाठी, शेतकऱ्यासाठी तसेच राष्ट्राच्या विकासासाठी महत्वाचे आहेत का? असतील तर ते किती प्रमाणात महत्वाचे आहेत. हे पाहण्यासाठी त्रोटक स्वरुपातील भारतातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग, महाराष्ट्रातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग, मराठवाडा विभगतील कृषीमाल प्रक्रिया उद्योग यांचा अभ्यास तसेच परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योगाचा व डाळप्रक्रिया उद्योगाचा सविस्तर अभ्यास करणे महत्वाचे आहे.

<u>भारतातील कडधान्य लागवड व उत्पादनाचा 2013-14 मधील त्रोटक आढावा :-</u>

भारतामध्ये कडधान्य लागवडी मध्ये तूर,मूग,मटकी,हरभरा,उडीद,मोहरी,या सारख्या पीकांचा समावेश कडधान्यामध्ये होतो.

तूर:- भारतातील तूर उत्पादक राज्यामध्ये क्षेत्र आणि उत्पादनात महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे.महाराष्ट्रामध्ये 2013 मध्ये 10लाख 96 हजार हेक्टर इतके क्षेत्र तुरीखाली होते. तर 2014 मध्ये 10 लाख 37 हजार हेक्टर इतके क्षेत्र होते. 2013 च्या तुलनेत 2014 मध्ये तुर लागवड क्षेत्रात 5% घट झाली होती उत्तर प्रदेशामध्ये मात्र 3लाख 49 हजार हेक्टर क्षेत्र तूर लागवडी खाली होते मात्र 2014 मध्ये

ते घटवून 3 लाख 20हजार हेक्टर एवढे झाले. राज्यनिहाय तुर लागवड व उत्पादना संबंधी तक्ता पुढे दिलेला आहे. त्यावरुन आपणास कडधान्य पीकांची लागवड व उत्पादन सहज लक्षात येईल.

*राज्यनिहाय तूर लागवड, हेक्टरी उत्पादन व एकुण उत्पादनाचा आढावा:-

राज्य	क्षेत्र 000 हे.		उत्पादकता किलो / हेक्टर		एकुण उत्पादन टनामध्ये	
	2013	2014	2013	2014	2013	2014
महाराष्ट्र	1096	1037	828	566	907.49	586.94
कर्नाटक	818	703	850	640	795.30	449.92
मध्यप्रदेश	532	521	780	820	414.96	427.01
आंध्रप्रदेश	435	376	780	635	339.30	238.76
उत्तरप्रदेश	349	320	690	730	240.81	223.72
इतर	624	606	725	650	452.40	393.90
पूर्णभारत	3854	3563	791	654	3050.3	2330.25

संदर्भ (Pulses India Annul Meeting-2015 Gov.India)

वरील तक्ता अभ्यासाला असता आपणास हे स्पष्ट दिसते की 2013 च्या तुलनेत 2014 मध्ये सरासरी व एकणू तूर उत्पादनात घट झाल्याचे दिसते या वरुन असे स्पष्ट होते की, कृषी प्रक्रिया उद्योगाचा अभाव व कृषी विषयीचे अज्ञान प्रक्रिया उद्योगाची वाढ केल्यास नक्कीच वाढत्या उत्पादनाचे लाभ शेतकरी, लघु प्रक्रिया उद्योजक व राष्ट्राच्या जी.डी.पी तील कृषी उत्पन्नाच्या वाटयात देखील वाढ होईल.

मूग:- भारतातील राज्यवार मूग लागवड, हेक्टरी उत्पादन व एकुण उत्पादनाचा आढावा

राज्य	क्षेत्र 000 हे.		उत्पादकता किलो / हेक्टर		एकुण उत्पादन टनामध्ये	
	2013	2014	2013	2014	2013	2014
राजस्थान	923	850	525	425	486.15	361.25
महाराष्ट्र	488	319	600	550	268.80	175.45
मध्यप्रदेश	112	163	300	435	33.60	70.91
कर्नाटक	298	244	550	475	163.90	115.90
आंध्रप्रदेश	141	90	500	450	70.50	40.50
उत्तरप्रदेश	75	64	450	400	33.75	25.60
इतर	400	355	415	367	166.13	130.13
पुर्णभारत	2400	2085	510	441	1222.83	919.73

(Pulses India Annul Meeting-2015 Gov.India)

वरील तक्त्या वरुन असे स्पष्ट होते की, मूग लागवडीच्या बाबतीत राजस्थान राज्य सर्वात अग्रेसर असुन 2013 मध्ये 9 लाख 26 हजार हेक्टर क्षेत्रावर मूग पीकाची लागवड होते. तर ती पुढे 2014 मध्ये घटवून 8लाख 50 हजार हेक्टर एवढी झाली. राजस्थानच्या खालोखाल महाराष्ट्रराज्याच्या मूग लागवडीचा दुसरा क्रमांक लागतो. 2013 मध्ये 4लाख 48 हेक्टर क्षेत्र मूग पीकाखाली होते. तर 2014 मध्ये प्रतिकुल हवामानामुळे 3लाख 19हजार क्षेत्र मूग पीकाखाली होते म्हणजेच 29% लागवडीत घट झाली होती. उत्तर प्रदेश मध्ये सर्वात कमी मूग पीकाची लागवड होते. 2013 मध्ये 75 हजार हेक्टर क्षेत्र, तर 2014 मध्ये 64हजार हेक्टर क्षेत्र एवढीच लागवड झाली.

मूग लागवडीत महाराष्ट्राचा क्रमांक दुसरा असला तरी 2013 मध्ये सर्वात जास्त मूग उत्पादन महाराष्ट्रात हेक्टरी 600 किलो एवढे आले आहे. एकुण मूग उत्पादनात राजस्थान आघाडीवर आहे. तर सर्वात कमी मूग उत्पादन उत्तर प्रदेशामध्ये घेतले जाते.

उडीद :- राज्यवार उडीद लागवड, हेक्टरी उत्पादन व एकुण उत्पादनाचा आढावा.

राज्य	**क्षेत्र 000 हे.**		**उत्पादकता किलो / हेक्टर**		**एकुण उत्पादन टनामध्ये**	
	2013	**2014**	**2013**	**2014**	**2013**	**2014**
मध्यप्रदेश	640	**862**	275	**410**	176	**353.14**
उत्तरप्रदेश	577	561	400	360	230.80	201.96
महाराष्ट्र	330	**256**	566	540	186.78	138.24
राजस्थान	157	**179**	450	400	70.65	**71.60**
कर्नाटक	84	60	450	425	37.80	25.50
आंध्रप्रदेश	38	29	425	400	16.50	11.30
इतर	561	553	408	403	228.80	222.90
पुर्णभारत	2387	**2500**	397	**410**	946.98	**1025.22**

(Pulses India Annul Meeting-2015 Gov.India)

वरील तक्त्यात ठळक अंक उडीद उत्पादनातील हेक्टरी उत्पादकता व एकुण उत्पादनातील वाढ दर्शवतात

तक्त्यामध्ये दर्शवलेल्या राज्य निहाय कडधान्य पीकांचा अभ्यासकेला असता. असे निदर्शनास येते की, भारतामध्ये डाळप्रक्रिया उद्योगासाठीचे वातावरण अनुकूल असून डाळप्रक्रिया उद्योग भारतातील

लघू,मध्यम तसेच मोठे शेतकरी यांना दिलासा देऊ शकतो.त्या दृष्टीने कृषीप्रक्रिया उद्योगाअंतर्गत डाळप्रक्रिया उद्योगाला चालना देणे गरजेचे असेल.

भारतातील निवडक डाळ प्रक्रिया उद्योग :-

अ.क्र	उद्योग समुहाचे नाव	उद्योगाचे ठिकाण	राज्य	स्थापना वर्ष
1	नारायण दाल उद्योग	अकोला	महाराष्ट्र	24-05-2007
2	गोयल कॅटल फिड	रायपुर/कर्नाल	छत्तीसगढ/हरियाणा	2015
3	रामचंद्र मदनलाल बजाज दाल मिल	गुलबर्गा	कर्नाटक	-
4	जितेंद्र दाल मिल	इंदोर	मध्यप्रदेश	1972
5	ककरानिया दाल मिल	अमरावती	महाराष्ट्र	1976
6	प्रियांम पल्सेस	कात्नी	मध्यप्रदेश	12-02-2016
7	यश प्रोटीन्स इं.प्रा.लि	गुलबर्गा	कर्नाटक	15-06-2012
8	राज्यस्थान पल्सेस	कानपूर	उत्तरप्रदेश	15-12-2014
9	विष्णू ओ.पी.एस.इं.प्रा.लि	जयपूर	राज्यस्थान	1977
10	गरुदाद्री दाल मिल	गुंटूर	आंध्रप्रदेश	1999
11	राधाकृष्ण राईल ॲण्ड दाल मिल	गुंटूर	आंध्रप्रदेश	1984

संदर्भ :- (दाल- विकिपीडिया-2017)

भारतातील वरील निवडक दालप्रक्रिया उद्योगाचा आढावा लक्ष्यात घेता. भारतातील या प्रमुख दाल प्रक्रिया उद्योगांनी भारतीय शेतकऱ्यांना कडधान्य उत्पादनासाठीची अनुकूल परिस्थीती निर्माण करुन दिली आहे. या निवडक दाल प्रक्रिया उद्योगाचा अभ्यासकरुन भारतातील कडधान्य उत्पादनासाठी अनूकूल वातावरण असणाऱ्या राज्यांनी राज्यामध्ये डाळ प्रक्रिया उद्योग रुजवण्यासाठी वरील डाळ प्रक्रिया उद्योगांचा आदर्श घेणे गरजेचे असेल

महाराष्ट्रातील डाळ प्रक्रिया उद्योग:-

महाराष्ट्र राज्याचा कडधान्य लागवडी मध्ये व उत्पादकतेमध्ये इतर राज्याच्या तुलनेत अधिक वाटा आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्रामध्ये डाळप्रक्रिया उद्योगासाठीचे वातावरण पोषक असून, डाळप्रक्रिया उद्योग भरभराटीस आणण्यासाठी महाराष्ट्रातील शेतकरी,वित्तीयसंस्था,जिल्हा उद्योग केंद्र, तसेच राज्यसरकाने सहभाग घेणे महत्वाचे ठरेल. शेतीमालवार कोणकोणत्या प्रक्रिया केल्या जाऊ शकतात याची तांत्रिक आणि अन्य माहिती देणारी बरीच पुस्तके बाजारात उपलब्ध आहेत. ती पुस्तके घेतल्यास बरीच नवी माहिती शेतकऱ्याला मिळू शकते. अशा प्रकारच्या उद्योगाची केवळ अर्थशास्त्रीय माहिती देणे या ठिकाणी गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील निवडक डाळ प्रक्रिया उद्योग :-

अ.क्र	उद्योगाचे नाव	उद्योगाचे ठिकाण	जिल्हा
1	अंबिका दाल मिल	MIDC जालना रोड चिकलठाणा	औरंगाबाद
2	महावीर दाल मिल	MIDC अंबड	नाशिक
3	महाराष्ट्र दाल मिल	वजीरानाका एल.टी रोड बोरीवली	मुंबई
4	गणेश दाल ॲण्ड बेसन मिल	अनंत शांती चेम्बर्स, बुधवारपेठ	पूणे
5	बजरंग दाल मिल	झांसी राणी जवळ, देऊळगावराजा रोड जालना	जालना
6	गोपाल दाल मिल	MIDC मेहरुण	जळगाव
7	नवदुर्गा दाल मिल	चिखली मौ.	नागपूर
8	लक्ष्मी दाल मिल	गोरेगांव	मुंबई
9	श्री भवानी दाल मिल	मालाड	मुंबई
10	हिंदुस्थान दाल उद्योग	नागपूर	नागपूर
11	नुतन दाल मिल	ममता गांधी रोड, मुंबई	मुंबई

वरील तक्ता पाहिला असता महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वेगवेळया प्रक्रिया उद्योगांची माहिती देऊन प्रक्रिया उद्योगासाठी प्रेरक वातावरण निर्माण करता येऊ शकते. शेतकरी ज्या पध्दतीने आपल्याच शेतामध्ये पीकणाऱ्या कडधान्याच्या डाळी तयार करुन विकण्या ऐवजी शेतात तूरी पीकवल्या की, त्या तशाच बाजारात नेऊन विकतो. पण त्या तूर विकत घेणारा व्यापारी मात्र त्यापासून दुप्पट नफा प्राप्त करतो. हि गोष्ट शेतकऱ्यांनी लक्ष्यात घेऊन कडधान्य पीकापासून डाळ प्रक्रिया उद्योग चालवण्यासाठी वरील उद्योजकांचा आदर्श घेणे ही काळाची गरज असेल.

मराठवाडयातील प्रक्रिया उद्योग :-

भौगोलिक दृष्टया मराठवाडयाचे क्षेत्रफळ (64526 sq.kms) एवढे आहे. यात कृषी योग्य क्षेत्रफळ 57.0 लक्ष हेक्टर एवढे आहे. मराठवाडयामध्ये औरंगाबाद,जालना,नांदेड,हिंगोली,परभणी,उस्मानाबाद,लातूर, तसेच बीड या आठ जिल्हयांचा समावेश होतो. पैकी जालना व लातूर वगळता उर्वरीत जिल्हयांची जमीन सखोल व काळी आहे. जामध्ये डाळ वर्गीय पीकांचे चांगल्या प्रकारे उत्पादन घेता येऊ शकते. यामूळे या विभागातील कृषीमाल प्रक्रिया उद्योगाला चालना मिळेल. शेतकऱ्यांचे दारिद्रय,उदासिनता, व्यसनाधिकता,बेरोजगारी तसेच बेकारी यासारख्या अनेक समस्या देखील सोडवल्या जातील.

उदाहरणा दाखल मराठवाडयातील लातूर जिल्हयात मौ.पाथरवाडी हे रेणापूर तालूक्यातील अगदी छोटेसे गांव आहे. येथील ज्ञानचंद्र प्रल्हाद खोत गेल्या सात वर्षा पासून मिनी डाळ उद्योग नेटाणे चालवीत आहेत. त्यांच्याकडे केवळ सात एक्कर शेती असून पारंपारिक पीक पध्दतीतून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवणे अशक्य आहे हे लक्ष्यात घेऊन त्यांनी प्रक्रिया उद्योगाची जोड आपल्या जिरायती शेतीस दिली.त्यांनी आपल्या शेतीत सोयाबीन,तूर,उडीद,मूग आदी डाळवर्गीय पीके घेऊन डाळप्रक्रिया उद्योगास सुरुवात केली. त्यांचा हा प्रक्रिया उद्योग मराठवाडयातील शेतकऱ्यांना आदर्श घेण्यासारखा आहे.

*मराठवाडा विभागातील निवडक डाळ प्रक्रिया उद्योग:-

अ.क्र	उद्योगाचे नाव	ठिकाण	जिल्हा	स्थापना वर्ष
1	प्रगती ॲग्रो इंडस्ट्रिज	तुळजापूर	उस्मानाबाद	1986
2	महावीर बेस्ट प्राईस	चेलीपूरा	औरंगाबाद	1979
3	जाधव प्रा.लि	सोनपेठ	परभणी	1998
4	मोतीफुड प्रोडक्ट	सुभाष रोड,	परभणी	1998
5	स्वस्तीक दाल मिल	हलशिहा, निलंगा	लातूर	1985
6	होम मेड स्नॅक्स ॲण्ड स्विट्स	सिडको	औरंगाबाद	1989
7	रमन पल्सेस मिल	Old MIDC Area	जालना	1993
8	राधे किरण पल्सेस प्रा.लि	मोंढा, औरंगाबाद	औरंगाबाद	1987
9	टिटोस् ऑरगॅनिक	नक्षत्रवाडी,औरंगाबाद	औरंगाबाद	1978
10	शिवशंकरदाल उद्योग	लातूर	लातूर	1985
11	श्री गणेश दाल मिल	कारेगाव रोड,परभणी	परभणी	1999
12	विवेक दाल मिल	सिडको,औरंगाबाद	औरंगाबाद	2001

वरील तक्त्यामध्ये मराठवाडयातील निवडक डाळ प्रक्रिया उद्योग करणाऱ्या

परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग व डाळ प्रक्रिया उद्योगाचे स्वरुप:-

परभणी जिल्हयाचा भौगोलिक आढावा लक्ष्यात घेता असे स्पष्ट होते की, परभणी जिल्हयाच्या वाटयाला प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक वातावरण पिकाच्या दृष्टीने उपलब्ध आहे. ही गोष्ट जिल्हयातील शेतकरी,सहकारी संस्था,सरकार यांच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. शेती योग्य पोषक वातावरण असतांना जिल्हयातील शेतकऱ्यांवर उपासमारीची,कर्जबाजारीपणाची,बेकारी,बेरोजगारीची वेळ येत आहे. या सर्व समस्यापासुन मुक्तता मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी शेतीबरोबरच व्यवसायत उतरुन नविन मार्ग स्विकारावा. काही शेतकरी निर्णय घेतात पण निश्चय मात्र करत नाहीत. या परिस्थीत कृषी पुरक

उद्योगातून नवनव्या वाटा निमार्ण करा. असे प्रतिपादन विभागीय कृषी सहसंचालक जनार्धन जाधव यांनी केले होते. आज पारंपारिकशेती पध्दतीत नफ्याचे प्रमाण घटले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या धर्तीवर मराठवाडयातील शेतकऱ्यामध्ये उद्योगाबाबत जार्गती करुन विशेषत: परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांनी महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पाअंतर्गत योजनांची माहिती घेऊन कृषी प्रक्रिया उद्योगाला चालना देणे गरजेचे आहे.

परभणी जिल्हयातील शेती सखोल मध्यम तसेच कमी प्रतिची या तीनही प्रकारची असल्या कारणाने निव्वळ उदारनिर्वाह म्हणून शेतीवर अवलंबून न राहता त्यांनी म.सा.कृ.वि. कार्यक्रमाचा लाभ घेणे फलदायी ठरु शकते. जिल्हयामध्ये कृषी उत्पादकतेचे प्रमाण अधिक असल्या कारणाने कृषी प्रक्रिया उद्योगासाठीचे अगदी पोषक असे वातावारण येथे आहे. तसे पाहता जिल्हयात कापूस प्रक्रिया उद्योगाचे प्राबल्य असल्याचे आढळून येते.

*परभणी जिल्हयातील सुक्ष्म आणि लघु उद्योग :-

NIC Code No.	Type of Industry	Number of Unit	Investment Rs. Lakh	Employment
20	Agro Based	183	3624	1600
22	Soda Water	0	0	0
23	Cotton Textile	32	2060	637
24	Woolen, Silk & Artificial Thread Base Clothes	0	0	0
25	Jute & Jute based	0	0	0
26	Readymade Garments and Embroidery	4	21	34
27	Wood and Wooden based Furniture	9	205	171
28	Paper and Paper Products	5	49	51
29	Leather based	0	0	0
30	Rubber and Plastic & Petro based	19	118	113
	Total	**252**	**6077**	**2606**

संदर्भ :- प्रकल्प संचालक (आत्मा) परभणी कृषी उत्पन्न बाजार समिती (सर्व)जिल्हा परभणी

वरील तक्त्यामध्ये परभणी जिल्हयातील सुक्ष्म आणि लघुउद्योग यांची एकुण संख्या 252 एवढी असुन या उद्योगांमध्ये एकुण भांडवल (6077 लाख रु.) गुंतवले आहे.तर या उद्योगांनी परभणी जिल्हयामध्ये एकुण 2606 ऐवढया लोकांना रोजगार मिळवून दिला आहे.प्रामुख्याने या मध्ये कृषी आधारित उद्योगाची संख्या सर्वाधिक असुन ती 183एवढी आहे. व यामध्ये एकुण भांडवला पैकी 3624लाख रु. एवढे भांडवल गुंतविले आहे. या वरुन आपणास असे लक्ष्यात येते की, परभणी जिल्हयामध्ये कृषी आधारित उद्योगांना आणखी प्रोत्साहन दिल्यास जिल्हयातील कृषी आधारित उद्योग अधिक बळकट बनतील

परभणी जिल्हयातील नियंत्रित बाजार पेठातील कडधान्य पिकांची तालुका निहाय वार्षिक आवक 2013-14

नियंत्रित बाजारपेठा	कडधान्य पिके					
	तूर आवक	मूल्य	मूग आवक	मूल्य	उडीद आवक	मूल्य
सेलू	1538.0	62747.0	538.1	26117.0	3.0	89.0
जिंतूर	5123.0	194655.0	1041.0	62472.0	274.0	12060.0
परभणी	1498.7	60525.3	548.1	28333.5	निरंक	निरंक
मानवत	45.6	1960.08	806.7	40660.6	निरंक	निरंक
पाथरी	821.0	32356.0	237.0	11506.0	निरंक	निरंक
सोनपेठ	542.0	23907.0	65.0	2941.0	निरंक	निरंक
गंगाखेड	345.0	15180.0	35.0	1554.0	निरंक	निरंक
पालम	18.0	6970	3.8	189.0	निरंक	निरंक
पूर्णा	225.0	8996.0	18.0	832.0	0.5	13.0
एकूण	10156.3	401024.1	3296.6	174605.0	277.5	12162.0

संदर्भ :- प्रकल्प संचालक (आत्मा) परभणी कृषी उत्पन्न बाजार समिती (सर्व)जिल्हा परभणी

वरील तक्ता अभ्यासला असता आपल्याला परभणी जिल्हयातील तालूका निहाय कडधान्य पीकाची आवक कशी आहे याची सहज कल्पना येईल. साधारणपणे परभणीतील पालम व मानवत या तालूक्यात कडधान्याची आवक अत्यल्प आहे असे दिसते. तर जिंतूर,सेलू व परभणी या कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये मात्र कडधान्याची चांगली आवक असल्याचे चित्र 2013-14 मध्ये दिसते. उर्वरित कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये तूर या कडधान्याची सरासरी आवक 483.25 (टन) येवढी असल्याचे दिसते एकूणच परभणी जिल्हयातील कडधान्याची कृषीउत्पन्न बाजार समित्यातील आवक (तूर,मूग,उडीद) तूर (10156.3 टन) मूग (3296.6 टन) उडीद (277.5 टन) यवढी आहे. या वरुन जिल्हयामध्ये डाळप्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक असणारी उत्पादकता लातूर जिल्हयाच्या मानाने खूप कमी आहे. परंतू डाळ विक्रि व डाळीसाठीची मागणी जिल्हयातील डाळ प्रक्रिया उद्योग पूर्ण करतात का ? हे पाहावे लागेल या साठी खालील एक तक्ता दिला आहे. ज्यावरून आपणास तालूक निहाय डाळीची विक्री लक्ष्यात येते.

परभणी जिल्हयातील तालूका निहाय डाळीची विक्री :-

तालूके	सेलू	जिंतूर	परभणी	मानवत	पाथरी	सोनपेठ	गंगाखेड	पालम	पूर्णा	एकूण
डाळीच विक्री (हजार रु.)	29431	18417	2842	-	94241	4243	9862	-	127	159166

जिल्हयातील तालूका निहाय डाळीच्या विक्री वरुन डाळप्रक्रिया उद्योगासाठीची आवश्यकता असल्याचे चित्र स्पष्ट दिसते. परभणी जिल्हयामध्ये एकूण डाळीची विक्री 159166 टन एवढी प्रचंड असून त्यामानाने डाळ प्रक्रिया उद्योगाचा विकास मात्र झालेला दिसत नाही असे का घडले असावे ? हे तपासून पाहण्यासाठी जिल्हयातील कडधान्य पीकाची हेक्टरी उत्पादकता तपासून पाहणे गरजेचे असेल. त्यासाठी खाली एक तक्ता दिला आहे. त्यावरुन डाळप्रक्रियासाठी ची स्थिती लक्ष्यात घेता येईल.

कडधान्य पीकाचे दर हेक्टरी अंदाजित उत्पादन संदर्भ वर्ष 2013-14

कडधान्य पिके	प्रति हे.उत्पादन(कि.मध्ये)	एकूण उत्पादन(हजार मे.टन)	गेल्यावर्षीच्या तूलनेत शे.वाढ
हरभरा	728.94	50.47	-80.39
तूर	629.34	66.82	-78.86
उडीद	425.41	3.974	-95.37
मूग	535.08	21.32	-89.19
मसूर	0	0	0
इतर कडधान्य	468.00	0.456	-84.22
एकूण कडधान्य	2786.77	143.03	---

संदर्भ :- जिल्हाअधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय, परभणी (2013-14)

वरील तक्त्यावरुन असे स्पष्ट दिसून येते कि, 2013 च्या तूलनेत 2014 मध्ये कडधान्य उत्पादकतेत घट झाली आहे. या घटीचे नेमके कारण सांगणे कठीण जरी असले तरी देखील काही कारणे मात्र या ठिकाणी नक्कीच नमूद करता येतील. ती अशी 2013 च्या तूलनेत 2014 मध्ये असणारी प्रतिकूल हवामान, जिल्हयामध्ये कडधान्य पिकाकडे केलेले दुर्लक्ष, कडधान्य प्रक्रिया उद्योगाचा अभाव हि

सर्व कारणे लक्ष्यात घेता उत्पादकता वाढीसाठीचे प्रयत्न म्हणून कृत्रिम प्रयोग करणे ज्यामध्ये डाळप्रक्रिया उद्योगांची भरभराट करुन कडधान्य उत्पादनाला चालना देणे.

विषयाचे महत्व :-

विकासाचे लाभ ग्रामीण भागापर्यंत पोहचण्यासाठी भारतामध्ये सहकारी क्षेत्राचा विकास घडवून आणण्यात आला. तसेच शेतकऱ्यांच्या उत्पन्ना वाढ स्थैर्य आणण्यासाठी कृषी माल प्रक्रिया करणारे उद्योग ग्रामीण भागात स्थापन करणे महत्वाचे होते व आजही आहे. कारण भारतातील बहुसंख्य जनता ही ग्रामीण भागात राहते व त्यांच्या रोजगाराचे साधन शेतमजूरी,बिगर शेतमजूरी,रोजगार,विविध कृषीमाल प्रक्रिया उद्योगातील मजूरी किंवा स्वंयरोजगार या प्रकारची असते. अशा वेळी कृषीमाल प्रक्रिया उद्योगाच्या विकासातून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

शेतकरी आपल्या शेतात राब-राब राबून कच्चा माल पिकवितो व आपला कच्चा माल कारखानदारांना काडीमोल किंमतीला विकतो. याच कच्च्या मालापासून कारखानदार,उद्योजक पक्का माल तयार करुन भरमसाठ नफा कमवतात. याची शेतकऱ्याला कल्पना देखील नसते. वास्तविक शेतकरी त्यानेच विकलेल्या कच्च्या मालापासून तयार केलेल्या वस्तू स्वत: खरेदी करतो. परंतू त्याच्या कच्च्या मालाची व त्यापासून उद्योजकाने तयार केलेल्या पक्क्या मालाच्या किंमतीची तुलना देखील तो करत नाही. त्यामुळेच त्याला शेतीमालावर प्रक्रिया करण्याच्या उद्योगाचे महत्व लक्ष्यात येत नाही. त्यामुळे कृषीमाल प्रक्रिया उद्योग ही काळाची गजर असल्याचे प्रत्येक शेतकऱ्यांनी लक्ष्यात घेतले पाहिजे.

डाळप्रक्रिया उद्योगाच्या अनुषंगाने या विषयाचे असणारे महत्व परभणी जिल्हयातील कडधान्य पिकांसाठी निश्चितच न्याय देणारे असे असणार आहे. या प्रक्रिया उद्योगाची भरभराट करण्याच्या दृष्टीने परभणी जिल्हयातील कडधान्य उत्पादकता ही चांगली असून फक्त प्रक्रिया उद्योगाची आवश्यकता आजघडीला अधिकाधिक आहे.

डाळीचे मानवी आहारातील महत्व लक्ष्यात घेता आहारात आवश्यक असणारे प्रथिने कडधान्य उत्पादना पासून पुरवली जातात. अशा अनेक अंगाने डाळप्रक्रिया उद्योगाचे महत्व असून या प्रक्रिया

उद्योगाविषयी अधिकची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवून शेतकऱ्याला प्रक्रिया उद्योगाविषयी जागरुक करुन नवसंजिवनी प्राप्त करुन देणे हे या विषयाचे महत्व असेल.

विषयाची मर्यादा :-

कृषीमाल प्रक्रिया उद्योगाची मर्यादा ही प्रामुख्याने नविन तंत्रज्ञान,महिलांचा अल्प सहभाग,कृषी प्रक्रिया उद्योगाविषयीचे असणारे अज्ञान, सहकारी संस्था तसेच बँका यांच्याकडून होणारा अपूरा कर्जपूरवठा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे शेतकरी वर्गामध्ये असणारी प्रक्रिया उद्योगाविषयीची असणारी उदासिनता या काही गोष्टी कृषीमाल प्रक्रिया उद्योगाच्या मर्यादा म्हणून लक्ष्यात घेतल्या जाऊ शकतात.

उद्देश :-

1. महराष्ट्रातील डाळप्रक्रिया उद्योगाचा त्रोटक आढावा घेणे.
2. मराठवाडयातील डाळप्रक्रिया उद्योगाचा आढावा घेणे.
3. परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योगाचा चिकित्सक अभ्यास करणे.
4. परभणी जिल्हा डाळप्रक्रिया उद्योगाचा अभ्यास करणे.
5. परभणी जिल्हयातील डाळप्रक्रिया उद्योगाचा तालूकानिहाय सविस्तर अभ्यास करणे.
6. डाळप्रक्रिया उद्योगाच्या स्थिती विषयी नमुन्याव्दारे पडताळणी करणे.

विषयाची गृहितके :-

1. परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योगाचा विकास संथगतिने होत आहे.
2. महाराष्ट्रातील डाळप्रक्रिया उद्योगात मराठवाडा विभागाचा वाटा अधिक आहे.

3. परभणी जिल्हयातील एकुण डाळ प्रक्रिया उद्योगात तूर डाळीचा वाटा वाढत आहे.

4. परभणी जिल्हयातील एकुण डाळ प्रक्रिया उद्योगात सेलू तालुक्याचा वाटा अधिक आहे.

संशोधन पध्दती :-

परभणी जिल्हयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग हा अभ्यास विषय शेती, शेतकरी तसेच लघू,मध्यम व मोठे उद्योग यांच्याशी संबंधीत असून या विषयाच्या अनुषंगाने काही प्राथमिक व दुय्यम सामग्रीचा अवलंब करणे संयुक्तीक ठरेल.

1. **दुय्यम सामग्री** :-

या विषयाचा अभ्यास करत असतांना पूर्वसुरींनी केलेले संशोधन संदर्भ म्हणून अभ्यासणे त्याचा तात्कालीक व सद्यस्थितीचा तुलनात्मक अभ्यास करणे, कृषीमाल प्रक्रिया उद्योगाशी संबंधीत खाजगी संस्था, सहकारी संस्था, प्रकाशने, प्रशासकिय अहवाल,वर्तमानपत्रे इ.चा 2000-01 ते 2016-17 हा सलग कालावधी घेवून अभ्यास जाणार आहे.

2. **प्राथमिक सामग्री** :-

प्राथमिक सामग्री संकलनासाठी शेतकरी,शेतमाल प्रक्रिया उद्योजक यांच्या प्रत्यक्ष मुलाखती तसेच डाळप्रक्रिया उद्योगाच्या प्रत्यक्ष भेटीव्दारे सामग्री संकलन करणे.

3. **नमुना निवड पध्दती** :-

1. निर्हेतुक नमुना पध्दती व्दारे जिल्हयातील प्रक्रिया उद्योगांना समान संधी देऊन नमुण्याची निवड करणे.
2. नमुना म्हणून जिल्हयातील 10% प्रक्रिया उद्योगाची निवड करणे.
3. नमुना म्हणून जिल्हयातील 50% डाळप्रक्रिया उद्योगाची निवड करणे.

4. नमुना निवडीमध्ये लॉटरी पध्दतीचा,टिपेटच्या क्रमांकाचे कोष्टक तसेच पध्दतशीर नमुना निवडीव्दारे संकलन करणे.

5. प्रश्नांवली भरुन व मुलाखत अनुसुचि याव्दारे माहिती जमा केली जाईल.

प्रकरण योजना :-

प्रकरण 1ले : प्रस्तावना

प्रकरण 2रे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण 3रे : भारतातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग

प्रकरण 4थे : मराठवाडयातील कृषीमाल प्रक्रिया उद्योग

प्रकरण 5वे : परभणी जिल्हयातील कडधान्य उत्पादनाची स्थिती

प्रकरण 6वे : परभणी जिल्हयातील डाळप्रक्रिया उद्योग

प्रकरण 7वे : परभणी जिल्हयातील डाळप्रक्रिया उद्योगाविषयी पडताळणी

प्रकरण 8वे : सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी

<u>*संदर्भ सुची :-</u>

1. मिश्र जयप्रकाश (2005) कृषी अर्थशास्त्र साहित्य भवन पब्लीकेशन, आगरा

2. फाले, कृ.ल, किशोर फाले (2005) सहकार चळवळ 1904-2004
शतकलेख संग्रह, निर्माण प्रकाशन, वर्धा.

3. कुमार अशोक (1990) ग्रामीण बॅकिंग मंजुल पब्लीकेशन, जयपुर.

4. दत्त रुद्र, के.पी. सुन्दरम (2003) भारतीय अर्थव्यवस्था एस चांद प्रकाशन, नई दिल्ली.

5. दांडेकर अजय, (2005) शेतकऱ्यांच्या आत्महत्या व ग्रामीण कंगालीकरण, समाज प्रबोधन पत्रिका

वर्ष 45- अंक-177

6. ॲग्रोवन - 2013-14 सप्टें अंक

7. कृषी अर्थशास्त्र डॉ.एस.सी.जैन / डॉ.पी.डी.माहेश्वरी कैलास पुस्तक सदन भोपाळ-2015

8. भारतीय अर्थव्यवस्था डॉ.एस.सी.जैन / डॉ.पी.डी.माहेश्वरी कैलास पुस्तक सदन भोपाळ-2016

9. भारतीय अर्थव्यवस्था- देसाई भालेराव निराली प्रकाशन जळगाव.

10. विकासाचे अर्थशास्त्र - देसले किरण जी दिपस्तंभ प्रकाशन - 2015

11. भारतीय अर्थव्यवस्था -देसले किरण जी दिपस्तंभ प्रकाशन - 2014 तृतीय आवृत्ती

12. लोकराज्य, महाराष्ट्र राज्य अंक जून 2012

13. किसान, केंद्रिय कृषी विभाग भारत सरकार जुन / जुलै 2013

14. कृषक, कृषीमंत्रालय महाराष्ट्र शासन जुन 2013

15. अन्नदाता - डॉ.रामोजीराव रामोजी फिल्मसिटी हैद्राबाद ऑक्टो.2014

*** मार्गदर्शक ***

डॉ.टी.व्ही.मुंडे

प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

के.के.एम. महाविद्यालय, मानवत

संशोधक

नाव:- उगले सुरेश श्रीहरी

डोळस निवास, पारीजात कॉलनी सेलू

ता.सेलू जि.परभणी